# **प्रेसनोट ता.४/०२/२०१९**

**चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन यांनी पुणे ग्रामीण चे रेकॉर्डवरील गुन्हेगाराकडून दोन गावठी पिस्टल व दोन काडतुसे हस्तगत केले आहेत.**

---

चतुःश्रृंगी पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये दिनांक ३/०२/२०१९ रोजी चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन कार्यालयात हजर असताना पोलीस उप निरीक्षक श्री प्रेम वाघमोरे यांना त्याचे बातमीदारामार्फ़त बातमी मिळाली की,मिटकॉन कॉलेजचे समोर,बालेवाडी पुणे येथे दोन इसम आपले जवळ गावठी कट्टे बाळगून फिरत आहेत.अशी खात्रीशिर बातमी मिळताच मिळालेल्या बातमीवरून मा.अप्पर पोलीस आयुक्त श्री सुनिल फुलारी पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर,मा.पोलीस उप आयुक्त,श्री डॉ.प्रसाद अक्कानवरू,परिमंडळ ४ पुणे शहर,मा.सहा.पोलीस आयुक्त,श्री कल्याणराव विधाते,खडकी विभाग पुणे शहर यांना माहिती देवून त्यांनी केलेल्या सुचना प्रमाणे दयानंद ढोमे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्रीमती वैशाली गलांडे पोलीस निरीक्षक गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक श्री संदेश केंजळे,पोलीस उप निरीक्षक प्रेम वाघमोरे, कर्मचारी पो.हवा.बाळासाहेब गायकवाड, पो.हवा.एकनाथ जोशी, ,पो.ना.सारस साळवी,पोना पक्राश आव्हाड,पोना दादा काळे, संतोष जाधव व पो.शि.तेजस चोपड,ज्ञानेश्वर मुळे पो.ना.संजय वाघ, पो.ना.अजय गायकवाड,पो.ना.,अमर शेख यांचे टिम ने इसम नामे **१) मयुर जयसिंग गायकवाड,वय २४ वर्षे,रा.राजगुरूनगर, तिनेवाडी रोड,संभाजीनगर,ता.खेड,जि.पुणे.२) अमर बाळासाहेब शेवाळे,वय २१ वर्षे रा.मु.पो.मंचर, मंगलमुर्ती कॉम्प्लेक्स,मंचर ता.आंबेगांव जि.पुणे.**यांना मिटकॉन कॉलेजचे समोर,बालेवाडी पुणे येथे ताब्यात घेवून त्यांची झडती घेतली असता **अ.क्र.१ याचेकडे ४५,२००/कि.रू चे एक लोखंडी रिव्हॉल्वर (सिक्सर) व एक काडतुस अ.क्र.२ याचेकडे ४५,२००/-कि.रू.एक लोखंडी गावठी पिस्टल व एक काडतूस** असा माल जप्त करण्यात आला आहे.सदर इसमांविरूध्द आर्म ॲक्ट ३(२५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पोलीस उप निरीक्षक प्रेम वाघमोरे हे करीत आहेत.

(दयानंद ढोमे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
चतुःश्रृंगी पो.स्टे.पुणे शहर


चतुःश्रृंगी पोलीस ठाणे, पुणे शहर
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
चतुःश्रृंगी पोलिस स्टेशन पुणे शहर